Maharashtra State Board Of
Secondary & Higher Secondary
Education
Latur Divisional Board
Latur-413531

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर**
**विभागीय मंडळ, लातूर- ४१३५३१**

सुतमिल एरिया,कन्हेरी रोड, राजस्थान शाळेच्या पाठीमागे, गजानन नगर, लातूर

Divisional Chairman Ph :(O2382) 229258 Divisional Secretary Ph :( O2382) 258570 Email: - divsecretarylatur@gmail.com

जा.क्र.लाविमं./माध्य.अ/2698
दिनांकः– 21/02/2025

**प्रति,**

**मुख्याध्यापक / प्राचाय**
**सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळा**
**उच्च माध्यः कनिष्ठ महाविद्यालये**
**लातूर/नांदेड/धाराशिव.**

**विषय** :– सन 2023–2024 मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील इ. 10 वी व इ. 12 वी च्या विद्यार्थ्यांचे परीक्षे शुल्क प्रतिपूर्ती करणेकरीता उर्वरित विद्यार्थ्यांचे बॅक खाते व अनुषंगिक माहिती सुधारित करण्यासाठी अंतिम संधी म्हणून दि. 18 फेब्रुवारी, ते दि. 28 फेब्रुवारी 2025 या कालावधीत ऑनलाईन पोर्टल उपलब्ध असल्याबाबत.

**संदर्भ** :–1. शासन निर्णय क्र. एससीवाय–2023/प्र.क्र.37/म–7,दि. 31/10/2023 व दि. 10/11/2023.
2 .शासन निर्णय क्र. संकीर्ण 2019/प्र.क्र.47/एसडी–5, दि. 1ऑगस्ट, 2019 व शुध्दीपत्रक दि. 3/2/2020
3. राज्य मंडळाचे पत्र क्र. रा. मं./सन2023 दुष्काळ ख. हं/पुणे 4, दि. 27/03/2024
4 राज्य मंडळाचे पत्र क्र. रा. मं/सन 2023 दुष्काळ ख. हं/4321 पुणे 4,दि. 29/10/2024
5 राज्य मंडळाचे पत्र क्र. रा. मं/सन 2023 दुष्काळ ख. हं/4464 पुणे 4,दि. 13/11/2024
6 राज्य मंडळाचे पत्र क्र. रा. मं/सन 2023 दुष्काळ ख.हं/4730 पुणे 4, दि. 10/12/2024
7 राज्य मंडळाचे पत्र क्र. रा. मं/सन 2023 दुष्काळ ख.हं/5022 पुणे 4,दि. 30/12/2024
8 राज्य मंडळाचे पत्र क्र.रा. मं/सन 2023 दुष्करळ ख.हं./179 पुणे 4, दि. 15/01/2025
9 राज्य मंडळाचे पत्र क्र.रा. मं/सन 2023 दुष्करळ ख.हं./439 पुणे 4, दि. 31/01/2025
10 राज्य मंडळाचे पत्र क्र.रा. मं/सन 2023 दुष्करळ ख.हं./705, दि. 18/02/2025

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय दि. 1/8/2019 व शुध्दीपत्रक दि. 3/2/2020 अनुसार, सन 2023–24 मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसुदृश्य भागातील इ. 10 वी व इ. 12 वीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती करणेकरीता ऑनलाईन पोर्टलद्वारे एकुण 5,99,064 विद्यार्थ्यांची नोंदणी संबंधीत माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाकडून करण्यात आलेली होती.

दि. 28 मार्च, 2024 ते दि. 13 नोव्हेंबर 2024 या कालावधीत नोंदणी झाल्यापैकी 3,40,165 पात्र विद्यार्थी/पालकांच्या "आधार संलग्न बॅक खात्यात" शासन निर्णयानुसार परीक्षा फी प्रतिपूर्तीची रक्कम रु. 16,63,58,460/– वर्ग करण्यात आलेली आहे.

सन 2023–24 मध्ये जाहीर झालेल्या दुष्काळसदृश्य भागातील विद्यार्थ्यांना इ. 10 वी व इ.12 वीच्या परीक्षा शुल्क परतावा तांत्रिक अडचणींमुळे मिळू शकला नाही. तांत्रिक अडणींमुळे पात्र विद्यार्थी फी परताव्याच्या लाभापासून वंचित राहू नये म्हणून उर्वरित 2,58,899 विद्यार्थ्यांचे बॅक खाते व अनुषंगिक माहिती सुधारित करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल दि. 3 फेब्रुवारी ते दि. 14 फेब्रुवारी, 2025 या कालावधीत राज्य मंडळ कार्यालयाकडून उपलब्ध करुन दिल्याबाबत संदर्भाधीन पत्र क्र. 9 अन्वये कळविण्यात आले होते.

निर्धारीत मुदतीत पुढील तपशीलात नमुद केल्याप्रमाणे इ. 10 वी चे 6,953 व 12 वी चे 3,140 विद्यार्थ्यांचे बॅक खाते तपशील व इतर अनुषंगिक माहिती संबंधित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईन पोर्टलवर भरलेली आहे.

| परीक्षा | प्रलंबित विद्यार्थी | महिती भरलेली विद्यार्थी | शिल्लक विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| इ. 10 वी | 1,62,740 | 6,953 | 1,55,787 |
| इ. 12 वी | 96,159 | 3,140 | 93,019 |
| एकूण | 2,58,899 | 10,093 | 2,48,806 |

इ. 10 वी चे 1,55,787 विद्यार्थी तसेच इ. 12 वी चे 93,019 विद्यार्थ्यांना अद्याप परीक्षा फी परतावा देणे अद्याप बाकी आहेत. शासनाकडून उपलब्ध झालेल्या निधीचा विनीयोग आर्थिक वर्ष 2024–2025 संपण्यापूर्वी दि. 31 मार्च, 2025 अखेर होणे आवश्यक असल्याने तसेच **एकही पात्र विद्यार्थी फी परतावा योजनेपासून वंचित राहू नये यासाठी पुनःश्च एकदा अंतिमतः संधी देण्यात येत आहे.**

परीक्षा फी प्रतिपूर्ती करण्याकरीता पात्र विदयार्थ्यांचे आधार लिंक असलेले बॅक खाते तपशील, विद्यार्थ्यांचे आधार कार्ड इत्यादी माहिती सुधारित करण्याकरीता **दि. 18 फेब्रुवारी ते दि. 28 फेब्रुवारी, 2025 या कालावधीत** ऑनलाईन पोर्टल सुरु करण्यात येत आहे. तेव्हा ऑनलाईन माहिती भरण्यात यावी **कोनताही विद्यार्थी परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती पासून** वंचित राहणार नाही याची काळजी घ्यावी **विद्यार्थी परिक्षा शुल्क प्रतिपूर्ती पासून** वंचित राहील्यास याची सर्वस्वी जबाबदार आपली राहील, याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव,
लातूर विभागीय मंडळ, लातूर

**प्रत माहितीस्तव सविनय अग्रषित :–**
मा. सचिव राज्य मंडळ पुणे.

**प्रत माहितीस्तव :–**

1. मा. शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर
2. शिक्षणधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद कार्यालय, लातूर नांदेड, धाराशिव